

# दत्तगुरु

दत्तगुरू मुर्ती
हातात कमळ
गोमाता पाठीशी
श्वान हे जवळ ॥१॥

नरसोबा वाडी
औदुंबर वासी
गाणगापुरात
माहुरी निवासी ॥२॥

त्रैमुर्ती हा राणा
अनूसुया माता
घेई अवतार
अत्रिऋषी पिता ॥३॥

सर्वांचे लोपले
कळी काळ भय
नाम नित्य जप
मन भक्तीमय ॥४॥

श्रीपाद वल्लभ
कमंडलू हाती
त्रिदेवांचे गुण
सर्व जण गाती ॥५॥

सौ. किशोरी शंकर पाटील
विरार